**संचालक फलोत्पादन**
(कृषि आयुक्तालय)
कृषि भवन जवळ, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५
**ई-मेल-** hortplantprotection@rediffmail.com
**दुरध्वनी क्र.** ०२०-२५५३८३३७

**पत्र**

जा.क्र.कृआ/फलो-३/आपयो/२०-२१/मा.सू./ २६६८८ /२०२०
कृषि आयुक्तालय (फलोत्पादन विभाग), महाराष्ट्र राज्य
पुणे-४११ ००५, दिनांक- ०२/११/२०२०

**प्रति,**

**विभागीय कृषि सहसंचालक,**
ठाणे / पुणे / नाशिक /
लातूर / अमरावती / नागपूर

**विषयः-** **आदिवासी कुटूंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला पिकाची लागवड योजना- सन २०२०-२१ मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भः-**कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.आपयो-२०२०/प्र.क्र.२१०/९अ दिंनाक-२८/१०/२०२०

राज्यातील पालघर, ठाणे, पुणे, अहमदनगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, नांदेड, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर व गोंदिया या १४ जिल्ह्यांमध्ये आदिवासी कूटूंबाच्या परस बागेत फळझाडे व भाजीपाला लागवड योजना राबविण्यास संदर्भीय शासन निर्णयान्वये सन २०२०-२१ करीता प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. योजना अंमलबजावणीच्या मार्गदर्शक सूचना सोबत सहपत्रित करण्यात येत आहेत.

मार्गदर्शक सूचना व जिल्हानिहाय भौतिक व आर्थिक लक्षांक विभागातील जिल्ह्यांना त्वरीत देण्यात यावा, तसेच योजना प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही तात्काळ सुरु करण्यात यावी.

**सोबत-** वरीलप्रमाणे

**संचालक फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे- ४११००५

**प्रत-**
१. **मा. सहसचिव, कृषि व पदुम विभाग,** मंत्रालय विस्तार, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. **मा.आयुक्त (आदिवासी विकास) महाराष्ट्र राज्य,** नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. **संचालक, कृषि प्रक्रिया व नियोजन,** कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५ यांना माहितीसाठी तथा आवश्यक कार्यवाहीस्तव समादराने सादर.
४. **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,** पालघर, ठाणे, पुणे, अहमदनगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, नांदेड, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर व गोंदिया यांना माहितीसाठी तथा आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषीत.



Scanned by CamScanner

# आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला पिकाची लागवड योजना

## सन २०२०-२१ मार्गदर्शक सूचना

**१. प्रस्तावना-**

राज्यातील आदिवासी भागातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने पौष्टीक आहार निर्माण करण्यासाठी आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला लागवड करण्यास प्रोत्साहन देण्याची योजना राज्यात सन २००३-०४ पासून राबविण्यात येत आहे.

राज्यात आदिवासी भागात कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याने त्यांचे आहारात जीवनसत्व व इतर आवश्यक पोषक द्रव्ये उपलब्ध होण्याच्या हेतुने या कुपोषित भागासाठी पौष्टीक आहार योजना तयार करण्यात आली आहे. परसबागेत उपयुक्त फळे व भाजीपाल्याचा समावेश करुन आहार अन्नद्रव्याच्या दृष्टीने परिपुर्ण करता येणे शक्य होईल, राज्यातील पालघर, ठाणे, पुणे, अहमदनगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, नांदेड, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया या आदिवासी भागातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने पौष्टीक आहर निर्माण करण्यासाठी आदिवासी कुटुंबाच्या घराभोवती असलेल्या परसबागेत विशिष्ट भाजीपाला व फळांची निवड करुन लागवड करण्यास प्रोत्साहन देण्याची फळझाडे व भाजीपाला पिकाची योजनेस शासन निर्णय दि.२८ ऑक्टोंबर, २०२० अन्वये मान्यता प्राप्त झाली असुन एकूण आर्थिक कार्यक्रम २५.९९ लाखापैकी योजनेकरीता एकुण रु. ७.२६ लाख अनुदानाची तरतुद मंजुर करण्यात आली आहे.

**२. उद्दिष्ट**

आदिवासी लाभार्थ्यांच्या परसबागेत फळझाड व भाजीपाला पिकांची लागवड करण्यासाठी १०३१७ उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते, यापैकी शासन निर्णयानुसार अर्थसंकल्पातील तरतूद रक्कम रु.२२ लाख करण्यात आलेली आहे यापैकी ३३ टक्के म्हणजे ७.२६ लाख मंजुर केलेला आहे, त्यानुसार यापुर्वी सादर केलेल्या प्रस्तावातील भौतिक कार्यक्रम कमी करण्यात येत आहे. सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी फळझाडे व भाजीपाल्याची कलमे/ रोपे ही शासकिय रोपवाटिका, कृषि विद्यापीठ रोपवाटिका अथवा नोंदणीकृत खाजगी रोपवाटीकांमधून पुरविण्यात यावीत. तसेच बियाणे, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावे. कलमे/ रोपे व बी-बियाणाचा पुरवठा एकूण रु. २५२/- तरतुदीच्या व क्षेत्राच्या मर्यादेच्या अधीन राहून देण्यात यावा.

**३. लाभार्थी निवड-**

आदिवासी क्षेत्रातील ज्या कुपोषणग्रस्त गांवामधील आदिवासी कुटुंबाकडे शेतजमीन किंवा परसबाग उपलब्ध असेल अशा आदिवासी लाभार्थीची सन २०२०-२१ या वर्षी लाभार्थी म्हणुन निवड करण्यात यावी. राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशनच्या बैठकातील निर्णयांची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने लाभार्थी निवड करतांना ज्या आदिवासी कुटुंबात कुपोषीत बालके असतील अशा आदिवासी शेतक-यांच्या कुटुंबाला या योजनेचा प्राधान्याने लाभ देण्यात यावा, मात्र यापूर्वी लाभ घेतलेल्या लाभधारकांना या योजनेचा पुन्हा लाभ देण्यात येऊ नये.

आदिवासी कुटुंबामध्ये कुपोषणाचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर असल्याने विशेष बाब म्हणून ज्या जिल्ह्यातील सर्व आदिवासी शेतकऱ्यांना या योजनेचा यापुर्वी लाभ दिलेला आहे, अशा जिल्ह्यांमध्ये ज्या आदिवासी शेतकऱ्यांनी या योजनेमध्ये पुर्वी लाभ घेतलेला आहे त्यांना चक्रीय पध्दतीने किमान ५ वर्षाचे कालावधीनंतर पुनश्चः लाभ देण्यात यावा, असे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

४. **फळझाडे / भाजीपाला -**

या कार्यक्रमांतर्गत १) चिकू २) आंबा ३) पेरु ४) दोडका ५) गवार ६) मेथी ७) पालक ८) दुधी भोपळा चा मागणीनुसार इतर भाजीपाला जसे आळू, वांगी इ. स्थानिक गरजेनुसार आवश्यक / मागणी असलेली फळझाड ची कलमे/रोपे व भाजीपाला रोपे / बियाणे याचा पुरवठा करण्यात यावा.

५. **लाभ द्यावयाचे साहित्य व सामुग्री पुरवठा -**

लाभार्थीस कलमे/ रोपे तसेच बी-बियाणाचा पुरवठा एकूण रु. २५२/- तरतुदीच्या मर्यादेत आणि त्याचे परसबागेतील लागवड योग्य असलेल्या क्षेत्र मर्यादेच्या अधिन राहून देण्यात यावा.

६. **अनुदान-**

या योजनेतंर्गत **प्रति आदिवासी कुटुंबांना कमाल रु. २५२/- एवढा खर्च अपेक्षित आहे.** याअंतर्गत आवश्यकतेनुसार फळझाडांची रोपे/कलमे व भाजीपाला बियाणे पुरविण्यात यावीत. लाभाधारकांना फळझाडे व भाजीपाल्याची कलमे/रोपे ही शासकिय अथवा नोंदणीकृत खाजगी रोपवाटिकांमधून घेता येतील. यापैकी बियाणे घटकाचा पुरवठा महाबीजकडून उपलब्ध करुन पुरवठा करावा. प्रति लाभार्थी रु. २५२/- किंमतीची फळझाडे / भाजीपाला बियाणे याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे-

**आदिवासी शेतक-यांना द्यावयाचे लागवड साहित्य**

| अ.क्र | फळे / भाजीपाला | लाभार्थीना द्यावयाची कलमे/रोपे /बियाणे (संख्या प्रमाण) | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १) | चिक्कू | १ | ६० |
| २) | आंबा | १ | ५० |
| ३) | पेरु | १ | ४० |
| ४) | दुधी भोपळा | ५० ग्रॅम | २४.४० |
| ५) | दोडका | ५० ग्रॅम | २६.८५ |
| ६) | गवार | ५० ग्रॅम | १८.५० |
| ७) | मेथी | १०० ग्रॅम | ११.०० |
| ८) | पालक | १०० ग्रॅम | २१.२५ |
| **९)** | **एकूण** | | **२५२/-** |

७. **अंमलबजावणी करणारी यंत्रणा-**

सदर कार्यक्रम संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेमार्फत राबविण्यात यावा.

८. **लाभार्थी प्रशिक्षण -**

रोपांची लागवड, जोपासना, फळे काढणी व भाजीपाला यांचे खाद्यपदार्थ तयार करणे इत्यादीबाबत प्रशिक्षण ग्रामस्तरावर देण्यात यावे. प्रशिक्षणासाठी होणारा खर्च आत्मा मधुन करण्यात यावा.

९. **सनियंत्रण व आढावा -**

सबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी या योजनेचा गांवनिहाय आढावा घेऊन लागवडी संबंधीचा अहवाल व योजनेचा प्रगती अहवाल विभागीय कृषि सहसंचालक यांचेमार्फत संचालक (फलोत्पादन) यांना सादर करावा.



Scanned by CamScanner

**१०. योजनेअंतर्गत तपासणी-**

या योजनेतंर्गत लागवड केलेल्या परसबागेतील लागवडीची तपासणी खालील मापदंडानुसार करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १) | विभागीय कृषि सहसंचालक | ०.५ टक्के |
| २) | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | १ टक्के |
| ३) | उपविभागीय कृषि अधिकारी | २ टक्के |
| ४) | तालुका कृषि अधिकारी | ५ टक्के |
| ५) | मंडल कृषि अधिकारी | २५ टक्के |
| ६) | कृषि पर्यवेक्षक | १०० टक्के |

**११ मुल्यमापन-**

या योजनेचे मुल्यमापन दरवर्षीप्रमाणे करण्यात येऊन त्याबाबतचा मुल्यमापन अहवाल खालील प्रमाणे विहित तक्ता क्र-१ ते ४ मध्ये पाठविण्यात यावा.

**तक्ता क्रमांक-१**

| | | |
|---|---|---|
| १ | लाभार्थीचे नांव | |
| २ | गावाचे नांव | |
| ३ | तालुका | |
| ४ | जिल्हा | |
| ५ | लाभार्थीचे वर्गीकरण | आदिवासी / बिगर आदिवासी |

**तक्ता क्रमांक-२**

| **योजनेत सहभागी झाल्याचे वर्ष** | | | |
|---|---|---|---|
| **योजनेअंतर्गत फळझाडे/ भाजीपाला यापैकी कशाचा समावेश होता** (नांवे व संख्या द्यावी) | | | |
| **अ.क्र** | **फळे/भाजीपाला प्रकार (लागवड साहित्य)** | **लाभार्थीना द्यावयाची कलमे/रोपे /बियाणे (संख्या प्रमाण)** | **अंदाजित रक्कम रुपये** |
| १०) | चिक्कू | १ | ६० |
| ११) | आंबा | १ | ५० |
| १२) | पेरु | १ | ४० |
| १३) | दुधी भोपळा | ५० ग्रॅम | २४.४० |
| १४) | दोडका | ५० ग्रॅम | २६.८५ |
| १५) | गवार | ५० ग्रॅम | १८.५० |
| १६) | मेथी | १०० ग्रॅम | ११.०० |
| १७) | पालक | १०० ग्रॅम | २१.२५ |
| १८) | एकूण | | २५२/- |

Scanned by CamScanner

## तक्ता क्रमांक-३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | लाभार्थीने लाभ घेतलेले वर्ष | | | | | | | |
| २ | लाभार्थीस मिळालेले उत्पादन | | | | | | | |
| | फळपिके | | | | भाजीपाला | | | |
| | फळपिकाचे नांव | उत्पादन (किलो) | | | भाजीपाला पिकाचे नांव | उत्पादन (किलो) | | |
| | | स्वतः वापर | विक्री | एकूण | | स्वतः वापर | विक्री | एकूण |
| १ | चिकू | | | | १) मेथी, | | | |
| २ | आंबा | | | | २) पालक | | | |
| ३ | पेरु | | | | ३) दुधी भोपळा | | | |
| | | | | | ४) गवार | | | |
| | | | | | ५) दोडका | | | |
| इतर भाजीपाला जसे आळू, वांगी इ. त्याचप्रमाणे स्थानिक गरजेनुसार आवश्यक / मागणी असलेली फळझाडे यांची कलमे/रोपे तसेच भाजीपाला रोपे / बियाणे | | | | | | | | |
| | **एकूण** | | | | **एकूण** | | | |

## तक्ता क्रमांक-४

| | | |
|---|---|---|
| १ | योंजनेबाबत लाभार्थीचे अभिप्राय | |
| २ | क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांचे अभिप्राय | |
| ३ | क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांचे नांव, हुद्या व सही | |

## गोषवारा पत्रक

| अ.क्र. | गावाचे नांव | तालुका | लाभार्थी संख्या | यशस्वी लाभार्थी संख्या | अयशस्वी लाभार्थी संख्या | पुरविण्यात आलेल्या कलमा / रोपांची संख्या | पुरविण्यात आलेल्या निविष्ठा / किलो ग्रॅम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

**१२ आहरण व संवितरण अधिकारी-**

या कार्यक्रमासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना जिल्हास्तरावर आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करणेत येत आहे.

**१३ अनुदान लेखाशिर्ष**

या योजनेतंर्गत होणारा खर्च रु. २२.०० लाख (अक्षरी रु. बावीस लक्ष फक्त) सन २०२०-२१ या वर्षाकरिता मंजूर व अर्थसंकल्पीत केलेल्या निधीच्या ३३ टक्केच्या मर्यादेत म्हणजेच रु.७.२६ लक्ष तरतूदीनुसार खालील लेखाशिर्षातून भागविण्यात यावा.

**मागणी क्र. टी-५, २४०१ - पीक संवर्धन**

**(७९६) जनजाती क्षेत्र उपाययोजना**

**(०१) (३२) आदिवासी जिल्हयात परसबाग योजना**

**(२४०१ A-८०६) ३३ अर्थसहाय्य**

**मंजूर कार्यक्रम-**

या योजनेतंर्गत राबवावयाच्या जिल्हा निहाय कार्यक्रमाचे प्रपत्र-१ सोबत सहपत्रित करणेत येत आहे. तसेच आदिवासी जिल्हयामधील तालुक्यांची यादी प्रपत्र-२ मध्ये सहपत्रित करणेत येत आहे. त्याप्रमाणे योजना राबविणेबाबत तात्काळ कार्यवाही करणेत यावी.



Scanned by CamScanner

## प्रपत्र-१

### आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला पिकाची लागवड योजना
### सन २०२०-२१ मधील शासनास सादर केलेला एकूण आर्थिक २५.९९ लाख नुसार भौतिक कार्यक्रम

| अ.क्र. | जिल्हा | लाभार्थी संख्या | खर्च प्रमाणक | एकूण लागणारी आर्थिक तरतूद(रु लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | पालघर | १४०० | रु. २५२/- प्रमाणे प्रति लाभार्थी खर्च | ३.५२८ |
| २ | ठाणे | ५०० | | १.२६ |
| ३ | पुणे | ५०० | | १.२६ |
| ४ | अहमदनगर | १००० | | २.५२ |
| ५ | नाशिक | १८०० | | ४.५३६ |
| ६ | धुळे | ७०० | | १.७६४ |
| ७ | नंदुरबार | १००० | | २.५२ |
| ८ | जळगांव | ३०० | | ०.७५६ |
| ९ | नांदेड | ५०० | | १.२६ |
| १० | अमरावती | ३०० | | ०.७५६ |
| ११ | यवतमाळ | ९०० | | २.२६८ |
| १२ | गडचिरोली | ६०० | | १.५१२ |
| १३ | चंद्रपूर | ५०० | | १.२६ |
| १४ | गोंदिया | ३१७ | | ०.७९८८४ |
| | **एकूण** | **१०३१७** | | **२५.९९८८४** |

टिप- सदर योजनेसाठी रु.२५.९९ लाखाचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. त्यापैकी शासन निर्णयानुसार रक्कम रुपये ७.२६ लाख इतक्या अनुदान मर्यादेत कार्यक्रमाला प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे, त्यानुसार आयुक्तालय स्तरावरुन लवकरच सुधारित भौतिक व आर्थिक लक्षांक देण्यात येईल.

Scanned by CamScanner

| अ.क्र | जिल्हा | उपाययोजनेतंर्गत समाविष्ट तालुके |
|---|---|---|
| | | ५) कुरखेडा<br>६) गडचिरोली<br>७) आरमोरी<br>८) चार्मोशी |
| १२ | चंद्रपूर | १) राजूरा<br>२) गोदपिंपरी<br>३) मूळ<br>४) चंद्रपूर<br>५) नागभिड<br>६) शिदेवाही<br>७) ब्रम्हपुरी<br>८) चिमूर<br>९) वरोरा<br>१०) भद्रावती |
| १३ | अमरावती | १) धारणी<br>२) चिखलदरा |
| १४ | गोंदिया | १) गोंदिया<br>२) गोरेगांव<br>३) तिरोडा<br>४) अर्जुनी/मोर<br>५) देवरी<br>६) आमगांव<br>७) सालेकसा<br>८) सडक अर्जुनी |

**टिप :** उपरोक्त तालुक्याव्यतिरिक्त नवीन तालुक्यांचा आदिवासी विभागामार्फत समावेश झालेला असल्यास त्या तालुक्यामध्येही ही योजना राबविण्यात यावी.

**संचालक फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे- ४११००५

Scanned by CamScanner